दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३११ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.५ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# श्री गणेश जयंती निमित्ताने महागणपती चरणी भक्तांची मांदियाळी




**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण : कोरोनाचे संकट काही अंशी दुर झाल्याने हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी शुक्रवार दि ४ फेब्रुवारी २०२२ रोजी आलेल्या श्री गणेश जयंती निमित्ताने जुळून आला. त्यामुळे श्री महागणपती चिरनेर चरणी नतमस्तक होण्यासाठी नवीमुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी आप आपल्या कुटुंबासह मंदिरात श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते. यावेळी मंदिर परिसरात भाविकांची मांदियाळी भरली होती.**

निसर्गरम्य डोंगर कुशीत वसलेल्या उरण तालुक्यातील चिरनेर या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे. या गावातील जनतेने १९३० साली ब्रिटिश सरकार विरोधात सत्याग्रह पुकारुन देशाच्या स्वातंत्र्यासाठी गावकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले होते. गावात असणारे महागणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. शिलाहार राजवटीत निर्मिलेले महागणपती मंदिर ततत्कालीन मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केले.

मात्र तत्पूर्वी गणेशभक्तांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळील तलावात सुरक्षित लपवून ठेवली होती. तद्नंतर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना देवाने स्वप्नात येऊन मला तलावातून बाहेर काढ असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी तलावाचे खोदकाम करून मूर्ती बाहेर काढली. आणि नविन पाषाणी भव्य मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केली. महागणपतीचे मंदिर पाषाणी, गोल घुमटाचे असून पूर्वाभिमुख आहे. मंदिरात स्थानापन्न असलेली महा–गणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मासनात बसलेली आहे. मुर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मुर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे.

नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गावातील महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाच्या दर्शनाला व हुतात्म्यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भूमीचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी असते, कोरोनाच्या संकटात नंतर श्री गणेश जयंती निमित्ताने योग भाविकांसाठी उघड्या झालेल्या मंदिरामुळे पुन्हा जुळून आला.

त्यामुळे उरण, पनवेल प्रमाणे नवी मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, पेण मधिल भाविक मंदिरात दर्शनार्थ पहाटेच्या सुमारास ये– जा करत होते, भजन, किर्तन यामुळे मंदिर परिसरातील भक्तगण भावनिक वातावरणात तलीन झाले होते. येणाऱ्या भाविकांना देवस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबांना श्रीच्या दर्शना पासून वंचित राहावे लागले होते. त्यांची हि इच्छा यावर्षी शुक्रवार दि ४ फेब्रुवारी आलेल्या श्री गणेश जयंतीच्या सोहळ्या निमित्ताने पुर्ण झाल्याने अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती. श्री गणेश जयंतीचे औचित्य साधून मंदिर परिसरात ये– जा करणाऱ्या भाविकांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करावे अशा प्रकारच्या सूचना देवस्थानच्या कमिटी कडून भाविकांना देण्यात येत होत्या.

# अलिबाग - विरार कॉरिडोरबाबत शेतकऱ्यांच्या बैठकीला प्रांताधिकारीच गैरहजर

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी प्रांताधिकाऱ्यांची तारीख पे तारीख



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अलिबाग – विरार मल्टिमॉडेल कॉरिडोरबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून त्यांचा संभ्रम दूर करून शासनाच्या कामात सुरळितपणा यावा यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी बाधित शेतकऱ्यांसमवेत प्रांत अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेतला. मात्र शासनाला मदत होणाऱ्या प्रकारामध्ये पनवेलचे उपविभागीय अधिकारीच अडचण निर्माण करीत असल्याची भावना येथे बैठकीसाठी उपस्थित राहिलेल्या शेतकऱ्यांनी बोलून दाखविली. आज शुक्रवारी प्रांताधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी दीपक निकम, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, क्रांतिकारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष नामदेवशेठ फडके, वामनशेठ शेळके, बोर्ले गावचे माजी सरपंच बाळकृष्ण पाटील आदींसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहिले. मात्र उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी कोणतीही कल्पना न देता बैठकीला गैरहजर राहण्याचा पवित्रा अवलंबला असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला.

यावेळी प्रमुख शेतकऱ्यांमध्ये नरेंद्र भोपी, सुभाष भोपी, डी.के.भोपी,सुनील वसंत पाटील, दीपक पाटील, रमेश फडके, चंद्रकांत फडके, अरुण जळे, अनंता पाटील, नितीन भोपी, किसान माळी, रुपेश पवार, रोशन कडवं, बाळाराम फडके, राजेंद्र मेस्त्री, किशोर पाटील, प्रसाद पाटील, लहू पाटील, बाळाराम ठाकूर आदींसह शेतकरी बांधव उपस्थित राहिले होते. गेल्या काही महिन्यांपासून अलिबाग – विरार कॉरिडोरबाबत शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरवून त्यांना विरोध करायला भाग पाडणाऱ्या तथाकथित पदाधिकाऱ्यांचा डाव शिवसेनेने हाणून पाडला, एका बाजूला आम्ही जनतेसाठी आहोत असे सांगून प्रत्यक्षात त्यांच्या विकासाला विरोध करण्याचे काम येथील स्थानिक पदाधिकारी करीत आहेत, म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी शेतकऱ्यांच्या मनामध्ये असलेला संभ्रम दूर करण्यासाठी तत्काळ मिटिंगचे आयोजन करावे, अशा आशयाचे लेखी निवेदन पनवेलचे उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना २८ जानेवारी रोजी दिले होते, या निवेदनानंतर पनवेलचे उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी मंगळवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी बैठकीची वेळ दिली होती, ही वेळ पुन्हा ४ फेब्रुवारी करून बैठक

.../२

# अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर महसूल विभागाची दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । माणगाव**

अवैध वाळू उत्खनन कारणाऱ्यांविरोधात माणगाव तालुक्यातील महसूल विभाग आक्रमक झाला असून, कारवाईचे सत्र सुरूच आहे. अश्याच प्रकारे ३१ जानेवारी रोजी नांदवी गावानजीक असणाऱ्या टोळ खुर्द येथे महसूल विभागाने अवैध वाळू उत्खनन करुन वाहतूक करताना दोन गाड्या पकडल्या व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर गोरेगाव मंडळ विभागाने दंडात्मक कारवाई केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की , अवैधरित्या वाळू उत्खनन करून वाळूची वाहतूक करण्यात येणार असल्याची माहिती मिळताच गोरेगाव चे मंडळ अधिकारी सानप व नांदवी सजा तलाठी आमरे यांनी टोळखुर्द गावच्या हद्दीत एम एच ०६ एस.४८१७ व एम एच०६ बी.डी ०३२३ या क्रमांकाच्या गाड्या पकडल्या व त्यांना जागेवर अनुक्रमे ३०,००० रु व ३१००० रू चा दंड लाऊन तो वसूल केला. सदर महिन्याभरात गोरेगाव विभागाने तीन वेळा कारवाई केल्याने अवैध वाहतुक करणाऱ्यांचे धाबे

.../२

## संक्षिप्त...

### परीक्षार्थींची होणार मेटल डिव्हाईसद्वारे तपासणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) सरळसेवा भरतीअंतर्गत तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील ५६५ पदे भरण्याकरिता ऑनलाईन परीक्षांना ३१ जानेवारी २०२२ पासून प्रारंभ झाला असून ७ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या परीक्षेसाठी राज्यातील विविध जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर सर्व परीक्षार्थींची मेटल डिव्हाईसद्वारे तपासणी करण्यात येणार आहे. म्हाडातर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये राज्यातील दोन परीक्षा केंद्रांवर काही उमेदवारांनी गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाययोजना म्हणून परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर मेटल डिव्हाईसद्वारे परीक्षार्थींची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रियेबाबत माहिती देताना 'म्हाडा'चे सचिव राजकुमार सागर यांनी सांगितले की, दि. ३१ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी, २०२२ दरम्यान झालेल्या परीक्षेदरम्यान दोन परीक्षा केंद्रांवर उमेदवाराच्या जागी डमी उमेदवार बसल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डमी उमेदवाराकडून पोलिसांनी चीप असलेले एक इलेक्ट्रॉनिक उपकरण हस्तगत केले आहे. म्हाडाची परीक्षा प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पडली जात आहे, असे सांगत सागर म्हणाले की, परीक्षेला आलेल्या सर्व उमेदवारांचे फोटो काढले जातात व खात्री पटल्यानंतरच त्यांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जातो. संपूर्ण परीक्षेच्या दरम्यान प्रत्येक उमेदवार सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत असतो.

# घरासमोरील सारवलेले अंगण हे कोकणातील गावांचे वैभव : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील गणेशनगर गा–वचे ग्रामदैवत श्री गणेश मंदिराचे उदघाटन माघी गणेशोत्सवाचे शुभ मुहूर्तावर पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते करण्यात आले.



यावेळी पालकमंत्री यांनी गणेश नगर गावाची रचनात्मक मांडणी,तेथील निसर्ग सौंदर्य वातावरण, नुतन गणेश मंदिर उभारणी आणि ग्रामस्थांची एकता पहाता घरासमोरील सारवलेले अंगण हे कोकणातील गावांचे वैभव आहे ते टिकवुन ठेवले पाहिजे असे मनोगत व्यक्त करताना सांगितले. अधिकपणे बोलताना खासदार सुनिल तटकरे साहेबांच्या कार्यप्रणालीवर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकास प्रणालीवर जनतेने ठेवलेला विश्वासाला तडा जावु न देता आपण एका परिवारतील आहोत या भावनेतून काम करत राहु. गणेशनगर गावाला विकासासाठी निधीची कमतरता पड्डु देणार नाही असे आश्वाशीत केले. ग्रामस्थांनी भव्यदिव्य गणेश मंदिर उभारणी करण्यासाठी दिलेले योगदान कौतुकास्पद आहे. जसे देखणे मंदिर उभारले आहे तशीच सुंदर आणि सुबक गणेश मूर्ती पंढरपूर येथुन

.../२

# नाट्यगृहे, रेस्टॉरंट्स, थिएटर रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी

## पनवेल महापालिका हद्दीत शिथिलतेबाबत नवी नियमावली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका क्षेत्रात कोविड संसर्गाची स्थिती नियंत्रणात आल्याने राज्य शासनाच्या आदेशानुसार पनवेल महापालिका हद्दीत देखील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. नाट्यगृहे, रेस्टॉरंट्स, थिएटर या आस्थापनांच्या वेळा तसेच भजन आणि इतर सर्व स्थानिक, सांस्कृतिक तसेच करमणुकीच्या कार्यक्रमांची वेळ सकाळी ६ ते रात्री १२ अशी निश्चित करण्यात आली आहेत. सदर नियमांचे सर्व आस्थपनांनी काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ जानेवारी २०२२ रोजी शिथिलतेचे आदेश जाहीर केले आहेत. राज्य शासनाने आस्थापनाच्या वेळा या स्थानिक प्राधिकरणाने ठरवण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे पनेवल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी महापालिका कार्य क्षेत्रातील आस्थापनांच्या वेळा जाहीर केल्या आहेत. याचबरोबर सकाळी ६ ते रात्री १० यावेळेत इतर आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) तसेच समुद्रकिनारे, उद्याने, खुली राहतील. सदर ठिकाणी कोविड अनुरूप वर्तनाचे नागरीकांकडून पालन केले जाईल या बाबतची दक्षता संबंधित प्रभाग क्षेत्र अधिकारी घेण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ ते ६० अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता, यामधील कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल. याशिवायचे शिथिलतेचे सर्व नियम हे राज्य शासनाच्या नियमांप्रमाणेच महापालिका क्षेत्रात लागू होतील, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# महावितरणमध्ये ग्राहकांच्या वीजबिलाची शून्य थकबाकी करण्यासाठी प्राधान्याने लक्ष देऊन काम करणे गरजेचे आहे : प्रसाद रेशमे

## महावितरणचा अधिकारी चुकल्यास त्याला घरचा रस्ता दाखविणार

**दै.रायगड नगरी । भांडूप**

महावितरणच्या कोंकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रसाद रेशमे यांनी भांडूप परिमंडलातील अभियंत्यांची आढावा बैठक महावितरण भांडूप परिमंडल कार्यालयात घेतली. या बैठकीत भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांच्या सोबत तिन्ही मंडलाचे अधीक्षक अभियंते, अरविंद बुलबुले, राजाराम माने, इब्राहीम मुलाणी व भांडूप परिमंडळचे सहाय्यक महाव्यवस्थापक प्रवीण रहांगदळे उपस्थित होते. तसेच तिन्ही मंडलाचे कार्यकारी अभियंता, तसेच वरिष्ठ व्यवस्थापक व्हिडीओ कॉन्फरेन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित होते.



मुख्य अभियंता भांडूप परिमंडल सुरेश गणेशकर यांनी यावेळी कामाचे संगणकीय सादरीकरण केले. तसेच सुरु असलेल्या वीजचोरी मोहीम व इतर कामाबाबत माहिती दिली. यावेळी, कोंकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रसाद रेशमे यांनी अभियंत्यांना प्रत्येक दिवस प्रभावीपणे काम करून आपले लक्ष्य साध्य करण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्यास सांगितले. त्यांनी, थकबाकीची वसुली, ग्राहकांची अचूक बिलिंग, स्ट्रीटलाईट, पाणीपुरवठा योजना, सार्वजनिक सेवा विभागांकडे असलेली वीजबिलांची थकबाकी तसेच देखभाल व दुरुस्तीच्या कामावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश सर्व अभियंत्यांना दिले. प्रत्येक अभियंत्याने वेग–वेगळ्या संकल्पनेतून शून्य थकबाकी करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न केले पाहिजेत. वीज जोडणी खंडित करण्यापूर्वी, थकबाकी असलेल्या ग्राहकांच्या आवारात वीज जोडणी खंडित करण्याची सूचना काटेकोरपणे चिकटवावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच बिलिंग हा आपल्या कामातला एक महत्वाचा घटक असून अचूक बिलिंग करणे गरजेचे आहे. त्यामुळे, योग्य प्रयत्न करून तसेच दर महिन्याला मीटर रीडिंग एजन्सी बैठक घेऊन स्थानिक अभियंत्यांनी आढावा घ्यावा. एजन्सीच्या कामात गैरप्रकार आढळल्यास

.../२

# सिडकोच्या ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेला उत्तम प्रतिसाद; १० हजार नागरिकांनी केली अर्ज नोंदणी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**




परवडणाऱ्या दरातील घरे, कनेक्टिव्हिटी आणि अन्य पायाभूत सोयी सुविधांमुळे नवी मुंबईमध्ये वास्तव्य करण्यासाठी तळोजा नोड हा सर्वसामान्य नागरिकांकरिता उत्तम पर्याय ठरत आहे. सिडकोच्या बहुतांशी गृहनिर्माण योजनांमधील गृहसंकुले तळोजा नोडमध्ये साकारण्यात आली आहेत. सिडकोने नुकत्याच आणलेल्या गृहनिर्माण योजने अंतर्गत तळोजा नोडमधील ५,७३० परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यात आली आ–हेत. सिडकोच्या या गृहनिर्माण योजनेला उत्तम प्रतिसाद लाभत असून आत्तापर्यंत १० हजार नागरिकांनी या गृहनिर्माण योजनेत अर्ज नोंदणी केली आहे.

तळोजा हा नवी मुंबईतील वेगाने विकसित होणाऱ्या नोडपैकी एक आहे. तळोजा नोड नवी मुंबईतील वेगाने विकसित होणार नोड आहे. मुंबई–पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. मेट्रोचे आ–गार तळोजा येथे असून मेट्रो मार्गेही हा नोड सीबीडी बेलापूरला जोडला जाणार आहे. या नोडमधील काही क्षेत्र हे शाळा, पदवी महाविद्यालये, प्रार्थनास्थळे, रुग्णालये, समाजकेंद्रे, वसतिगृहे इ. सामाजिक उद्देशांकरिता राखीव आहे. मेट्रो रेल्वेच्या स्थानकांलगत वाणिज्यिक उपक्रमांकरिता काही क्षेत्र हे सिडकोकडून निश्चित करण्यात आले

.../२

# संक्षिप्त...

## माथेरानचे सुपुत्र विनय धनावडे यांना श्रद्धांजली



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे सुपुत्र निवृत्त भारतीय सैनिक (सुभेदार) विनय रमेश धनावडे यांचे नुकताच आजारपणाने निधन झाले. माथेरान मधील एकमेव भारतीय सैनिक असल्याने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक छोटेखानी कार्यक्रम वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेच्या प्रांगणात धनगर समाजाचे अध्यक्ष तथा अश्वपाल संघटनेचे कार्यतत्पर सदस्य राकेश कोकळे आणि करन जानकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विनय यांच्या आठवणी कथन केल्या. विनय यांचे शालेय शिक्षण येथील सरस्वती विद्या मंदिर या शाळेत झाले होते त्यांच्या १९८४ बॅच मधील वर्ग मित्रांनी अश्रू अनावर होत आपल्या जुन्या आठवणी जाग्या करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे, माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, शकील पटेल, प्रदीप घावरे, राकेश चौधरी, माजी नगरसेविका वर्षा रोड्रिक्स, कुलदीप जाधव, कोकण वासीय समाजाचे अध्यक्ष शैलेंद्र दळवी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, वसंत कदम, यांनी आपले विचार यानिमित्ताने व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी शिवसेना शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, भालचंद्र सावंत, अण्णा शिंदे, नंदू धनावडे, दत्ता सनगरे, जनार्दन पार्टे, अरविंद शेलार यांसह अन्य ग्रामस्थ आपल्या भूमीपुत्राला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पालीत बल्लाळेश्वराचा माघी मासोत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : अष्टविनायक देवस्थानांपैकी एक पालीतील श्री बल्लाळेश्वराचा माघी मासोत्सव व श्री बल्लाळेश्वराचा जन्मोत्सव शुक्रवारी (ता.४) मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन नियम व अटी शर्थीचे पालन करून विधान धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. संपूर्ण परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.



जन्मोत्सवाला बाळ गणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तिभावाने पाळणा हलविण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे व राहुल मराठे आदींसह मंदिर पुजारी व गुरव, धनंजय गद्रे आदी मान्यवर व भक्त उपस्थित होते. जन्म सोहळ्याच्या कीर्तनास व इतर कार्यक्रमात फक्त ५० भाविक उपस्थित होते.

माघी महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर मंदिर व परिसरात रोषणाई, रांगोळी व सजावट करण्यात आली होती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने यात्रा आणि धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. परिणामी उत्सवात यावर्षी रस्त्यावर फक्त छोटी खेळण्यांची व इतर छोटी दुकाने लागली होती. तसेच काही विक्रेते, फेरीवाले, हातगाडीवाले व मिठाईवाले होते.

यावर्षी श्री गणेशाची पालखी देखील कोणताही गाजावाजा न करता साधेपणाने गाडीतून निघाली. तसेच पालखी रस्त्यात कोठेही थांबली नाही. लोकांना पालखीला न ओवाळता फक्त नमस्कार करण्यास सांगण्यात आले होते. भाविकांसाठी महाप्रसाद झाला नाही. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच देवस्थानचे सुरक्षारक्षक देखील तैनात करण्यात आले आहेत. वाहने राजीप शाळेच्या बाजूने भक्त निवास क्रमांक एक जवळून वळविण्यात आली होती.

# पनवेल जवळून इसमाचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका २८ वर्षीय इसमाचे अपहरण झाल्याची घटना तालुक्यातील पेठ गाव येथे घडली असून याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

मोहम्मद असलम निझामुद्दीन शेख (वय-२३, रा.-पेठ गाव) यांच्या पत्नीचे नातेवाईक नाझिर आलम व त्याच्यासोबत असलेली मुलगी हे लग्न करून त्यांच्या घरात राहण्यास आले होते. यावेळी तीन इसम हे त्यांचा शोध घेत मोहम्मद शेख याच्याकडे आल्यानंतर नाझिर आलम हा त्याच्या पत्नीसह पळून गेला.

त्या दोघांना आश्रय दिल्याचा राग या तीन इसमांनी मनात धरून आरोपींनी नाझिर व त्याच्या पत्नीचा शोध घेण्याकरीता मोहम्मद शेख याचा मोठा भाऊ एहसान अली यास टिळकनगर कुर्ला येथे घेऊन जातो असे सांगून त्यास सदर ठिकाणी न नेता त्याचे अपहरण केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवीन पनेवल येथून ७ लाख रूपये किंमतीच्या गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

७ लाख रूपये किंमतीची गाडी खांदेश्वर ओनर्स असोसिएशन से.-१ नवीन पनवेल याठिकाणी सार्वजनिक रस्त्यावर उभी करून ठेवली असता चोरी झाल्याची घटना घडली आहे.

कपिल फडतरे (वय-३२) यांनी त्यांची ७ लाख रुपये किंमतीची सफेद रंगाची मारूती सुझुकी बलेनो गाडी क्र.-एमएच ४६ बीके ९८८६ हि उभी करून ठेवली असता सदर गाडी चोरून नेण्यात आल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक निलेश पोळ करीत आहेत.

# आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप ; ब्रम्हगुरु फाऊंडेशनचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील कळंबोली, सालवड आदिवासी वाडी येथे आदिवासी बांधवांना ब्रम्हगुरु फाऊंडेशन मार्फत २०० ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर हद्दीतील कळंबोली, सालवड आदिवासी वाडी येथे आदिवासी बांधवांना माघी गणेश उत्सवाच्या निमित्ताने ब्रम्हगुरु फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत शिंदे, ट्रस्टी ब्रिजेश सिंग, कॅप्टन अंशु अभिषेक, प्रशांत सिंग, सत्यम सिंग यांच्या मार्फत ब्लँकेट वाटण्यात आले.या प्रसंगी युवासेना कर्जत तालुका सचिव कर्तव्य दक्ष समाजसेवक ॲड.संपत हडप, ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर सरपंच साक्षी संतोष मोहिते, सदस्या शैला हिलम, समाजसेवक दशरथ देशमुख, उपस्थित होते.



आदिवासी बांधवांना अनेक सुखसुविधा मिळाव्या हा मुख्य उद्देश या संस्थेचा असून त्यासाठी ही संस्था कार्य करत आहे. आदिवासी बांधवांचे थंडी पासून रक्षण होण्यासाठी संस्थेमार्फत आज २०० ब्लँकेट वाटप करण्यात आले.

चिंचवली - गणेगाव येथे गरजू व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात आले. ब्रम्हगुरु फाऊंडेशन चे सहकारी कॅप्टन अंशु अभिषेक, संस्थापक आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान संस्थेचा देखील उद्देश सामाजिक व धार्मिक कार्य करणे हा असून बाळ आश्रमाचे बांधकाम, बेरोजगार, गरीब, असहाय्य महिलांना प्रशिक्षित करून लघुउद्योगाद्वारे रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. ग्रामपंचायत विभागात ते यासाठी प्रशिक्षण शिबीर देखील लवकरच घेणार आहेत.

---

मा.सोनवणे साहेब

ॲड.माधुरी चतारे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व/क.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०३/२०२२

१) श्री.पोपटलाल प्रभुराम ठक्कर
वय : ७३ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.पी-एल५/२१/०२, सेक्टर १७,
नवीन पनवेल (पु.), जि.रायगड-४१०२०६
२) श्री.विपुलकुमार पोपटलाल ठक्कर
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.४, रुद्रा बंगलो, साईबाबा मंदिरा समोर,
रामदेवनगर, सॅटलाईट, अमदाबाद शहर
अमदाबाद, मनेकबाग, गुजरात-३८००१५
३) श्री.हेमंतकुमार पोपटलाल पुजारा
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए/१०३, स्टेटस २ अपार्टमेंट, साम्राज्य टॉवर
समोर, मेमनगर, अमदाबाद शहर, अमदाबाद,
मेमनगर, गुजरात ३८००५२ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.लीलाबेन पोपटलाल ठक्कर हे दि.२१/०३/२०२१ रोजी लाईफलाईन हॉस्पिटल, पनवेल येथे मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर कै.लीलालबेन पोपटलाल ठक्कर यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मौजे : नवीन पनवेल (पूर्व), ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील प्लॉट नं.६, सेक्टर क्र.१७, मधील इमारत क्रं.२१ मधील तळमजल्यावरील अपार्टमेंट क्रं.पी एल-५/२१/०२, क्षेत्रफळ ३३.२० चौ.मीटर बिल्टअप ही सदनिका त्यांचे हयातीत श्री.पोपटलाल पी.ठक्कर आणि त्यांची पत्नी कै.लीलाबेन पोपटलाल ठक्कर यांनी संयुक्तपणे दि.२०/०७/२०१२ रोजीचे कनव्हेन्स डीड ऑफ अपार्टमेंट या कराराने श्री.जयवंत शिवराम ठाकूर यांचेकडून खरेदी केली असून सदरचा कनव्हेन्स डीड ऑफ अपार्टमेंटचा दस्त मे.सह दुय्यम निबंधक, पनवेल २ यांचे कार्यालयात दि.०३/०८/२०१२ रोजी दस्त क्रं.०७१०५-२०१२ अन्वये नोंदविला आहे व ते सदर सदनिकेचे संयुक्तपणे (निम्मे) मालक झाले आहेत.

सदर संयुक्त मालकीतील कै.लीलाबेन पोपटलाल ठक्कर यांच्या हिश्श्याची मिळकत सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.लीलाबेन पोपटलाल ठक्कर यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३ माहे २ सन २०२२ रोजी मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व/क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व/क.स्तर, पनवेल**

---

राव साहेब
प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
दिपाली रामदास गावंड
वकील उच्च न्यायालय

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज १०९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

१) श्रीमती.बेबीबाई हरिश्चंद्र कोळी
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
सध्या रा.प्लॉट नं.४५२, सेक्टर २५ ए,
पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
पूर्वी रा.गणेशपुरी गाव, पो.उलवा,
ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.कल्पना अशोक पाटील
पुर्वाश्रमीची कु.कल्पना हरिश्चंद्र कोळी
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवघर, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.हरिश्चंद्र जोमा कोळी रा.प्लॉट नं.४५२, सेक्टर २५ ए, पो. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.०८/१०/२०२१ रोजी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, सेक्टर २२, नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झाले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमी संपादन निवाडा क्र. | सर्वेक्षणानुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे / संपादीत जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाड्यानुसार भूखंड वाटपात्री पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौमी |
| ULWA -6 | ३५/२ GP-53 GP-53A | ६९.३० | निवासी + वाणिज्यिक | ८३.७८ | उलवे (उपरोक्त प्रमाणे) | २५ ए | ४५२ | २६० |

कै.हरिश्चंद्र जोमा कोळी यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख ०३/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## ग्रामपंचायत विचुंबे

### ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, खाालील वर्णनित मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | इमारतीचे नाव | फ्लॅट क्र. | सद्यस्थितीतील मालकाचे नाव | खरेदी करणाऱ्याचे नाव | पवल क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मी कल्प | B-301 | महेंद्र सुकलाल भावसार तर्फे अखत्यारी म्हणून वंदना भावसार, वंदना महेंद्र भावसार | नरेश बळवंत जाधव, निशिगंधा नरेश जाधव | १२८४८/२०२० | ३७४ चौ.फु |
| २ | गंगा रेजेन्सी | D-202 | अपर्णा एकनाथ सावंत | निलेश नामदेव सावंत, नुपुर निलेश सावंत | १२८४७/२०२० | ३४.८५ चौ.मी. |
| ३ | श्री ज्ञानेश्वर माऊली को.ऑ.हौ.सोसायटी | L-9 | रामदास रघुनाथ हांडे | अजिंक्य मधुकर पाटील, अमिता अजिंक्य पाटील | ५६१८/२०१६ | ४४० चौ.फु |
| ४ | सुर्या इनक्लेव | 305 | पुरुषोत्तम बबन भोईर | नामदेव हरी मुकाटे, निता नामदेव मुकाटे | ३६७५/२०२० | ३५.८ चौ.मी. |
| ५ | ग्रीन व्हॅल्ली | 12 A-104 | जमिल यसुफ खतिब | अमित दिवान, रंजना दिक्षत | ३८०८/२०२० | ४५५ चौ.फु |
| ६ | सुर्या इनक्लेव | 303 | पुरुषोत्तम बबन भोईर | यशवंत पांडुरग जाधव | ७५१६/२०२० | ३५.८१ चौ.मी. |
| ७ | सुर्या इनक्लेव | 406 | पुरुषोत्तम बबन भोईर | मच्छगंधा गोविंद नावकर, गोविंद चांगू न्हावकर | ७६०२/२०२० | ३५१ चौ.फु |
| ८ | श्री ज्ञानेश्वर माऊली को.ऑ.हौ.सोसायटी | I-24 | यशवंत गणपत कोरडे | जया महादेव पोकळे, महादेव लक्ष्मण पोकळे | ११६४/२०२१ | ४४० चौ.फु |
| ९ | ग्रीन व्हॅल्ली | 1-303 | मे.वर्षा डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद गंगाराम जैन कु.मु.धारक शैलेश रामलाल ओसवाल | विक्टोरिया रयप्पन, रयमॅन्डो रयप्पन | ४२५९/२०१७ | ४१४ चौ.फु |
| १० | सुर्या इनक्लेव | 101 | पुरुषोत्तम बबन भोईर | जितेंद्र पद्माकर हातचांगे | ९१३४/२०२० | २१.७७ चौ.मी. |
| ११ | ग्रीन व्हॅल्ली | 7-301 | मे.वर्षा डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद गंगाराम जैन कु.मु.धारक सागर किसन पवार | अक्षय देवदास खोपकर, शुभांगी देवदास खोपकर | १८६९६/२०१९ | ३३० चौ.फु |
| १२ | ओमकार कृष्णा पार्क | B2-102 | वैभव सिताराम तावडे, भाग्यश्री गितेश लोहाळकर, चेतन सिताराम तावडे | मंगला सिताराम तावडे | १०११०/२०२१ | ३३५ चौ.फु |
| १३ | अनंता गणेशा | A-402 | अनंत रियल्टी तर्फे भागीदार भिखाबाई रणछोड मदत तर्फे अखत्यारी रतन पुंडलिक केणी | जयदीप नंदकुमार पाटील, प्राजक्ता जयदीप पाटील | ८०१७/२०२१ | २०.५० चौ.मी. |
| १४ | हरे कृष्णा अपार्टमेंट | B-205 | वैष्णवी डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा.प्रदीप रघुनाथ वाले, शितल संदीप लुबडे, संगीता भरत जाधव | कै.विजकुमार राजाराम साळवे मयत तर्फे कायदेशीर वारस अलका विजयकुमार साळवे, उमेश विजयकुमार साळवे | ११९४२/२०२१ | ६३५ चौ.फु |
| १५ | गंगा विहार | E-104 | चंद्रकांत भागुराम मोहिते | गिरीधर शंभू तांबे, शारदा गिरीधर तांबे | ७१३५/२०२१ | ४५१ चौ.फु. |
| १६ | सुर्या इनक्लेव | 105 | पुरुषोत्तम बबन भोईर | प्रसाद रोहिदास गुरव | ६५७५/२०२० | ३८५ चौ.फु |
| १७ | गंगा रेजेन्सी | B-104 | रेश्मा थॉमस | निखिल मोहन कदम तर्फे क.मु.तृप्ती निखील कदम | १२२६५/२०२१ | ५२.२४ चौ.मी. |
| १८ | शिव रेसिडेन्सी | I-202 | शिव एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार नरसी गोविंद रावरीया | पटेल नरेश खिमजी, ज्योत्स्ना खिमजी पटेल, दिपेन खिमजी पटेल | ४३८३/२०१७ | ३७.७४ चौ.मी. |
| १९ | श्री ज्ञानेश्वर माऊली को.ऑ.हौ.सोसायटी | G-32 | खर्गेंद्र धनाजी पेरेकर, देवेश धनाजी पेरेकर | गणेश नामदेव अढळ, जयश्री सालुराम हेमाडे | ११५३४/२०२१ | ५०० चौ.फु |
| २० | शिव रेसिडेन्सी | SHOP-02 | राबिन चंद्र बोर | अमर अरविंद दोशी, अरविंद नथुराम दोशी | १३७६९/२०२० | १७.१९ चौ.मी. |
| २१ | कृष्णा रेसिडेन्सी | 101 | कृष्णा इंटरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अच्छेलाल डी यादव | भोला चंद्रीका चौरासिया, रिना भोला चौरासिया | १०४५३/२०२१ | २१९ चौ.फु |
| २२ | कृष्णा रेसिडेन्सी | 305 | कृष्णा इंटरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अच्छेलाल डी यादव | भुषण बी चितळेकर, भार्गवी भुषण चितळेकर, पुजा भुषण चितळेकर | ९०५९/२०२१ | ३३४ चौ.फु |
| २३ | कृष्णा रेसिडेन्सी | 208 | कृष्णा इंटरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अच्छेलाल डी यादव | सुजाता राजाराम पाटील, राजाराम धर्माजी पाटील | १४३४३/२०२१ | २१९ चौ.फु |
| २४ | श्री कृष्ण रिव्हर व्हॅल्ली | B-104 | आदित्य इंटरप्रायझेस तर्फे भागीदार तेजस मनजी पटेल | प्रतिका विजय केणी | १४९७९/२०१८ | ३९० चौ.फु |
| २५ | श्री कृष्ण रिव्हर व्हॅल्ली | B-204 | आदित्य इंटरप्रायझेस तर्फे भागीदार तेजस मनजी पटेल | विजय अनंत केणी | १४९८१/२०१८ | ३९० चौ.फु |

तरी वरील वर्णनित प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सदर फ्लॅट मिळकतीमध्ये वा कोणत्याही ागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींना व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह ग्रामपंचायत कार्यालय विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील ७ रोजातील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## प्रकाश पाटील यांची उरण शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरचे काँग्रेसचे निष्ठावंत डॅशिंग व उत्तम वक्ते, स्वर्गीय बैरिस्टर ए आर अंतूले यांचे कट्टर समर्थक, सर्वांना सोबत घेऊन जाणारे, मनमिळावू व सर्वांना हसविणारे व्यक्तिमत्व असलेले प्रकाश पाटील यांची निवड उरण शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी दि ३/२/२०२२ रोजी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या कार्यालयात महेंद्र घरत यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली.१९९६ साली शहराचे युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. त्यावेळी युवकांना संघटित करून पक्षासाठी भरीव काम केले. सुरवातीपासून ते आजपर्यंत ते एकाच पक्षात राहून एकनिष्ठेने प्रामाणिकपणे पक्षाचा प्रचार, प्रसार केला. पक्षाच्या प्रत्येक आदेशाचे पालन केले. पक्षाच्या प्रत्येक आंदोलन, संपात त्यांनी सहभाग घेतला त्यामुळे त्यांची निवड उरण शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी करण्यात आल्याची माहिती यावेळी कामगार नेते महेंद्र घरत यांनी दिली. काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उरण तालुकाध्यक्ष जे डी जोशी, गणेश सेवक, अकलाख शिलोत्री, राम भगत, जितेश म्हात्रे, शैलेश तामगाडगे, गुफरान तुंगेकर, महेश भोईर, नागेश कांबळे आदी काँग्रेसचे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते.काँगेसच्या पदाधिकारी सदस्यांनी प्रकाश पाटील यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## शहीद भाई कोतवाल चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यार्तील क्रांतिकारक यांच्या जीवनावरील शहीद भाई कोतवाल या दिवंगत माजी सरपंच प्रवीण पाटील निर्मित केलेल्या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिले आहे. मुरबाड, कर्जत तालुक्याच्या भूमीत घडलेल्या रक्तरंजित इतिहासावर आधारित तयार झालेल्या बहुचर्चित शहीद भाई कोतवाल' चित्रपटाचा झेंडा लागला आंतर्राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात स्वरजाई आर्ट मिडीया प्रोडक्शन च्या चित्रपटास एमआयएफएफ मध्ये मिळाले पाच ( अवार्ड ) पुरस्कार मिळाले आहेत. मुंबई अंधेरी येथील मेयर ऑडिटोरीयम मध्ये झालेल्या आंतर्राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वात जास्त पुरस्कार मिळवून २०२०-२१ चा शहीद भाई कोतवाल हा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक चित्रपट,तसेच निर्माता - प्रविण पाटील ,सागर हिंदुराव,सिध्देश सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन - एकनाथ देसले आणि पराग सावंत तसेच सर्वोत्कृष्ट डि.ओ.पी - तुषार विभुते,सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन - देवदास भंडारे,सर्वोत्कृष्ट डि .आय - वैभव वामन यांना हेर पुरस्कार मिळाले आहेत.

# महाड येथे उद्भवणाऱ्या पूर परिस्थिती नियंत्रण उपाययोजनांबाबतआदिती तटकरे यांनी मंत्रालयात घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



महाड पूर निवारण व उपाययोजनांबाबत सर्वंकष आढावा आज मंत्रालयात राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

यावेळी खासदार श्री. सुनील तटकरे, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, महाड शहर नगराध्यक्षा स्नेहल जगताप, अपर जिल्हाधिकारी श्री. अमोल यादव, हे बैठकीस उपस्थित होते. यावेळी राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, पूर निवारणासाठी करावयाच्या महत्त्वाच्या उपाययोजनांच्या कार्यवाहीसाठी सद्य:स्थितीमध्ये सावित्री नदीच्या पाण्याची पातळी कमी असल्याचा काळ आहे. याबाबत प्रशासनामार्फत सर्व प्रकारे सकारात्मक कार्यवाही वेळोवेळी होत आहे. आजच्या बैठकीच्या आधारे सर्व संबंधित यंत्रणांच्या प्रगती कार्याचा नियमित आढावा विभागनिहाय बैठकीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. त्या पुढे म्हणाल्या, कोकण रेल्वे संदर्भातील अहवाल आयआयटी मुंबईकडून दि.१२ फेब्रुवारी रोजी तर राष्ट्रीय महामार्गासंदर्भातील अहवाल दि.१४ फेब्रुवारी रोजी प्राप्त होणार असून त्यानंतर पुढील दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याविषयीची कार्यवाही तात्काळ सुरू करण्यात येईल.

यावेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, कोकण किनारपट्टीवरील रायगड जिल्ह्याला वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतो. अतिपर्जन्याच्या या प्रदेशात कायमस्वरुपी ठोस उपाययोजना होण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने कालबद्ध अंमलबजावणी करावी, अशा सूचना दिल्या. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा महाड पूरनियंत्रण उपाययोजनांसाठी सर्व आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता प्राधान्याने करीत आहे. या उपाययोजनांशी संबंधित जलसंपदा विभाग, कोकण रेल्वे, सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यक त्या तांत्रिक बाबतीत तातडीचे सहकार्य जिल्हा प्रशासन करीत आहे. नदीपात्रातील गाळ काढून ठेवण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्थाही रायगड जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आल्याचे तसेच तातडीने उद्यापासूनच दहा डंपर व दोन पोकलेन गाळ काढण्याच्या कामास सुरुवात केली जाणार आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी यावेळी सांगितले.

याशिवाय, या परिसरात सीआरझेडमध्ये चार बेटे आहेत त्यापैकी एका बेटावर मगरींचे वास्तव्य आहे. याबाबत पर्यावरणीय परिणाम सर्वेक्षण पहाणीनंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. यावेळी पाटबंधारे विभागाने महाड परिसरातील नद्यांमधील गाळ काढण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी कुठेही खंड पडणार नाही तसेच नाम संस्थेस सर्व प्रकारचे सहकार्य विभागाकडून केले जाईल, असे स्पष्ट केले. राष्ट्रीय महामार्गावरील जुना सावित्री पूल काढून टाकण्याविषयीची कार्यवाही देखील मार्चपूर्वी पूर्ण करण्यात येईल, असे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

जुलै महिन्यात आलेल्या महापूरामुळे शहरातील महत्त्वाचा भाग पाण्याखाली होता. महाड तालुका कोकणातील सरासरी पर्जन्याहून अधिक पर्जन्यमान असलेला तालुका आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्ग, कोकण रेल्वे आदींमुळे शहराची लोकसंख्या अलिकडच्या काळात मोठ्या संख्येने वाढत आहे. पावसाळ्यात सावित्री नदीच्या पाण्याची पातळी वाढून जीवित व वित्तहानी होऊ नये, भविष्यात अतिवृष्टी व पूरामुळे उद्भवणाऱ्या आपतकालीन परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करणे अनिवार्य आहे. परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजनांमध्ये नजीकच्या कालावधीत कोकण रेल्वेच्या पूल परिसरातील भराव काढणे, सावित्री नदीचा गाळ व नदीपात्रातील बेटे काढणे, लहान धरणे बांधणे व सावित्री नदीपात्रातील अडथळे दूर करणे आदी महत्त्वांच्या कामांचा आढावा संबंधित शासकीय यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत आज मंत्रालय येथे आयोजित बैठकीत घेण्यात आला.

यावेळी बैठकीत कोकण रेल्वेचे मुख्य अभियंता नागनाथ राव, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता (यांत्रिकी) एम. एस. जीवने, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे डॉ. बाबाजी मस्कारे, आयआयटी मुंबईचे प्रो. सुबीमल घोष व पूर नियंत्रण समितीचे सदस्य उपस्थित होते.

## बिल्डर असोसिएशन ऑफ इंडीयाचे रायगड सेंटर अध्यक्षपदी नितिन बामगुडे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांवचे प्रसिद्ध उद्योजक नितिन बामगुडे यांची बिल्डर असोसिएशन ऑफ इंडीयाचे रायगड सेंटर अध्यक्ष पदी निवड झाली आहे. ऑनलाईन माध्यमातून निवड झाल्याचे पत्रक त्यांना मिळाले आहे. बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाची स्थापना १९४१ झाली आहे. बिल्डर्सच्या अडचणी, समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न या बिल्डर्स असोसिएशनच्या माध्यमातून करण्यात येतो. भारतामधील ही सर्वात पहिली बिल्डर लोकांची असोसिएशन आहे.

माणगांवमध्ये रायगड सेंटर २०१३ मध्ये झाल, त्याचे पहिले अध्यक्ष ड. राजीव साबळे होते तर सध्याचे अध्यक्ष प्रदीप गांधी होते, ज्यांनी हे पद बामगुडे यांना ३० जाने २०२२ रोजी माणगांव बिल्डर असोसिएशनच्या झालेल्या सभेत हँडओव्हर करताना दोघांनी देखील एकमेकाचे स्वागत आणि सत्कार केला. यावेळी मावळते अध्यक्ष प्रदीप गांधी यांच्या कार्यकारिणी व सदस्यांनी उत्तम पद्धतीचे काम केले असून, आता बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे माध्यमातून अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे आपली जबाबदारी वाढली असून ती चांगल्या पद्धतीने निभावेन, असा विश्वास नितीन बामगुडे यांनी व्यक्त केला. या आधी चांगले काम केल्यामुळेच आपल्याला बढती मिळाल्याचे ते म्हणाले. उद्योजक तथा माजी नगरसेवक नितीन बामगुडे हे अतिशय शांत व हुशार व्यक्तीमत्व म्हणुन ओळखले जातात. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या नितीन यांनी आपल्या स्वतःच्या जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर हे यश प्राप्त केले, आपल्या प्रेमळ बोलण्याने ते सहज सर्वांना आपलेसे वाटतात. मूळचे रोहा तालुक्यातील किल्ला येथील रहिवासी असलेले नितीन बामगुडे अनेक वर्षां पासून माणगांव येथे नितीन कन्स्ट्रक्शनचे चेअरमन मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून बांधकाम व्यवसायात कार्यरत असून, अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी ते निगडित आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पोलादपूर तालुका अध्यक्षपदी संभाजी साळुंखे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



गेल्या दीड वर्षापासून रिक्त असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पोलादपूर तालुका अध्यक्षपदाच्या निवडीवेळी माजी उपसभापती संभाजीदादा साळुंखे यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. पोलादपूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा झंझावात वेगाने होण्यासाठी संभाजीदादा साळुंखे यांच्या कारकिर्दीत विशेष प्रयत्न होतील, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दुणावला आहे.

पोलादपूर तालुक्यातील दणकेबाज व्यक्तीमत्व म्हणून गेली तब्बल २८ वर्षे संभाजीदादा साळुंखे यांचे संपूर्ण तालुक्याला योगदान माहिती आहे. शिवसेना तालुकाप्रमुख आणि पोलादपूर पंचायत समितीच्या उपसभापती पदासाठीची संभाजीदादा साळुंखे यांची कारकीर्द आजही पोलादपूरकरांच्या स्मरणात असून सुमारे १९९६ ते २०१० पर्यंत तालुकाप्रमुख पदाच्या प्रदीर्घ कालावधीत संभाजीदादा साळुंखे यांनी पोलादपूर पंचायत समितीसह तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका एकहाती करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. या दरम्यान १९९३-९६ या कालावधीत संभाजीदादा साळुंखे यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या उपसभापती पदाची धुरा सांभाळून प्रशासनावरील पकड सिध्द केली.

शिवसेना आणि काँग्रेस नेतृत्वाने आक्रमक नेतृत्व शैलीच्या संभाजीदादा साळुंखे यांची ताकद न लक्षात घेतल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून येत्या वर्षभरात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तसेच ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष म्हणून पुन्हा पक्ष कार्यकर्त्यांमध्ये जान फुंकण्याचे काम संभाजीदादा साळुंखे करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे महाड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांनी पोलादपूर तालुका काँग्रेस अध्यक्ष पदाची निवडणूक तातडीने घेऊन निवड करण्यासाठी आदेश दिल्यानंतर काही दिवसांतच ही निवड करण्याचे आयोजन करण्यात आले.

## सावरोली येथील आदिवासी पाड्याचे फेरविकास कार्य; पाड्यामधील सुमारे १३० रहिवाशांना याचा लाभ मिळणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



टाटा स्टीलने निफानवाडी या आदिवासी पाड्याचे रूप पालटून टाकण्यासाठी पावले उचलली आहेत. निफानवाडी हा आदिवासी कुटुंबांचा अधिवास असलेला पाडा रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील टाटा स्टीलच्या सावरोली पंचायत प्रकल्पाच्या नजीक आहे. या निवासी पाड्यामध्ये २२ झोपड्या असून सध्या या एकूण वस्तीची अवस्था फारच बिकट झालेली होती, विशेषतः पावसाळ्यात येथे पाणी साचून राहण्याच्या समस्येने रहिवासी खूपच त्रस्त झालेले होते. मात्र टाटा स्टीलच्या या उपक्रमामुळे पाड्यामधील सुमारे १३० रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आपल्या कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकीचा (सीएसआर) एक भाग म्हणून, टाटा स्टीलने या घरांच्या फेरविकासाकरीता (नूतनीकरणासाठी) मदतीचा हात पुढे केला. मातीमध्ये मुरूमची भर घालून या संपूर्ण परिसरातील भूभाग उंचावण्याचे कार्य केले आणि त्यावर काँक्रीट पसरवून टाकला. असे केल्यामुळे आता पावसाळ्याच्या दिवसांत येथील झोपड्यांमध्ये पाणी शिरण्यास प्रतिबंध होऊ शकेल. त्या खेरीज या पाड्याला जोडणारा आणि सर्व मोसमात टिकून राहील असा काँक्रीटचा रस्ता देखील येथे बांधण्यात आला. या उपक्रमामुळे सुमारे १३० रहिवाशांना लाभ पोहोचणार असून हे सर्वच रहिवासी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत.

निफानवाडीच्या रहिवाशी लता पवार म्हणाल्या, पूर्वी पावसाळ्यात येथील रस्ता पाण्याखाली बुडून जात असल्याकारणाने आमच्या वस्तीचा आजूबाजूच्या संपूर्ण परिसराशी संपर्क पूर्णपणे तुटून जात असे. परंतु आता या नवीन बांधलेल्या काँक्रीटच्या रस्त्यामुळे आम्ही संपूर्ण वर्षभर कुठेही ये-जा करू शकतो. या महत्वपूर्ण मदतीसाठी आम्ही टाटा स्टीलचे मनापासून खूप आभारी आहोत. स्टील क्षेत्रातील या दिग्गज कंपनीचा सीएसआर विभाग आरोग्यसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, शिक्षण आणि महिला सबलीकरण अशा विविध क्षेत्रातील समुदायांशी जवळीकीने कार्य करत असून परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देत आला आहे.

### भारतीय जनता पार्टीतर्फे मुरुडमध्ये

## मोफत आधार-पॅन स्मार्ट कार्ड युनिव्हर्सल पास, हेल्थ, ई-श्रम व कोविड-१९ कार्ड वाटप कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पक्षातर्फे ज्येष्ठनेते तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांच्याहस्ते भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शनिवार दि.५ व रविवार दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी आधार-पॅन स्मार्ट कार्ड, युनिव्हर्सल पास तसेच हेल्थ, ई-श्रम व कोविड-१९ कार्ड चे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

शहरातील शेगवाडा सुभाषचंद्र बोस मार्गावर राजयोग बंगला येथे भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात दि.५ व दि.६ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वा.ते दुपारी ५.०० वा. सदर कार्ड व पास चे मोफत वाटप करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक आधार कार्ड, एक पासपोर्ट साईज फोटो, सक्रिय मोबाईल व बँक पासबुक च्या झेरॉक्स प्रती इ.कागदपत्र आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन कोरोना-ओमायक्रॉन रोगाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अटि शर्ती व नियमांचे पालन करण्यात येऊन आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांनी केले आहे.




## घरफोडी करताना महिला व मुलींसोबत अश्लिल चाळे करणारा सराईत चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरात घुसून चोरी-घरफोडी करणाऱया व घरातील झोपलेल्या महिला व मुलींसोबत अश्लिल चाळे करुन त्यांचा विनयभंग करणाऱ्या एका सराईत चोरटयाला एपीएमसी पोलिसांनी कळवा भागातून शिताफीने अटक केली आहे. आदित्य प्रेमचंद गुप्ता (२२) असे या चोरटयाचे नाव असून गत जानेवारी महिन्यामध्ये या आरोपीने एपीएमसीच्या कोपरी भागातील एका घरात घुसून चोरी केली होती. तसेच घरात झोपलेल्या लहान मुलीचा विनयभंग करुन पलायन केले होते.

या गुन्ह्यात अटक अटक करण्यात आलेला आरोपी आदित्य गुप्ता हा ठाण्यातील कळवा भागात राहण्यास असून तो पहाटेच्या सुमारास घरात घुसून घरातील मोबाईल फोन व किंमती वस्तू चोरुन नेण्यात पटाईत आहे. चोरी करताना, त्याला घरात झोपलेली महिला अथवा मुलगी निदर्शनास आल्यास त्यांच्या सोबत छेडछाप व अश्लिल चाळे करण्याची त्याची सवय होती. गत ९ जानेवारी रोजी या चोरटयाने कोपरी गावातील एका घरामध्ये पहाटेच्या सुमारास प्रवेश करुन घरातील दोन मोबाईल फोन व रोख रक्कम चोरली होती. त्यानंतर या चोरटयाने घरामध्ये झोपलेल्या फिर्यादिच्या लहान मुलीच्या अंगावरील टॉप व लेगीन्स हत्याराने कापून मुलीला विविस्र करुन तिच्यासोबत अश्लिल चाळे करुन पलायन केले होते.

या प्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात घरफोडीसह विनयभंग तसेच पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर एपीएमसी पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेतला असता, सदर आरोपी हा सराईत चोरटा आदित्य गुप्ता असल्याचे आढळुन आले. मात्र सदर आरोपी हा मोबाईल फोन वापरत नसल्याने तसेच तो आपल्या घरी सुद्धा जात नसल्याने व तो एका ठिकाणी ३ ते ४ मिनीटा पेक्षा अधिक काळ थांबत नसल्याने त्याचा शोध घेणे पोलिसांना कठीण होते. मात्र पोलिसांनी त्याची अधिक माहिती काढली असता,तो कळवा येथे वडीलांच्या भाजी विक्रीच्या ठिकाणी वडिलांना भेटण्यासाठी अधुन मधून येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे परिमंडळ-१चे पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक नलावडे यांच्या सुचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कुंभार, पोलीस हवालदार चंद्रकांत कदम, जगन्नाथ धुमाळ, पोलीस नाईक प्रशांत ठाकुर, काळे, अमर भिलारे आदींच्या पथकाने कळवा भागात सतत १५ दिवस पाळत ठेवली होती. बुधवारी आरोपी आपल्या वडिलांना भेटण्यासाठी आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. त्यानंतर पोलिसांनी या आरोपीकडून ४ मोबाईल फोन व इतर ऐवज हस्तगत केला आहे. या आरोपी विरोधात एपीएमसी व तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीसह विनयभंगाचे ५ गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले आहे.